डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/३७० /२०२६ दि. ०२ /०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०५/०९/२०२६ रोजी होणारे दहिहंडी सणानिमित्त डोंबिवली पुर्व परिसरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना डोंबिवली यांचेकडुन कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या रोडवर राजेंद्रप्रसाद रोडवरील जोधपुर स्विट ते गिरणार चौक या परिसरात फडके वाँच कपंनीच्या बाजुला चार रस्ता पाटणकर चौक, डोंबिवली पुर्व येथे दि. ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजेपासुन ते रात्रौ २२:००वा. पावेतो दहिहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) टंडन रोड, डॉ. आर.पी. रोड व शिवमंदीर रोडने गिरणार चौक मार्गे चार रस्ता पाटणकर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गिरणार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व वाहने लेवा भवन कट अथवा टिप टॉप कॉर्नर, म्हाळगी चौक येथुन दत्तनगर चौक मार्गे नेरुरकर रोडने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) मानपाडा रोड, डॉ. आर.पी. रोड कडुन चार रस्ता पाटणकर चौक मार्गे गिरणार चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चार रस्ता पाटणकर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व वाहने संत नामदेव पथ, मानपाडा रोड अथवा ग्रीन चौक, चिपळुणकर पथ मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दि.०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजेपासुन ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीस्तव,

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.

CHAR RASTA, PATANKAR CHOWK, DOMBIVLI EAST

Dahihandi

